# मेट्रो रेल्वेची यशस्वी चाचणी

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो रेल्वे मार्गातील आरे कार डेपो ते मरोळ स्थानक या तीन किमी मार्गावर बुधवारी यशस्वी चाचणी घेण्यात आली. चाचण्यांना ऑगस्ट महिन्यापासून सुरुवात झाली असून विविध पातळ्यांवर चाचण्या घेतल्या जात आहेत. या मार्गावर कोणत्या सुधारणा अद्याप बाकी आहेत, हे जाणून घेण्यासाठी ही चाचणी घेण्यात आल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून सांगण्यात आले.